## मालमत्तेशी संबंधित बाबींच्या संदर्भात माहितीचा अधिकार कसा वापरावा?

<u>शब्दावली</u>

१. **केंद्रीय माहिती आयोग:-** माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम २(ख) अन्वये व्याख्या. केंद्रीय माहिती आयोग हे केंद्र सरकारच्या अधीन सार्वजनिक प्राधिकरणांशी संबंधित तक्रारी आणि अपीलांवर कार्यवाही करण्यास सक्षम प्राधिकरण आहे.

२. **माहिती:-** कलम २(च) अन्वये कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य, ज्यामध्ये अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिद्धीपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यांवये सार्वजनिक प्राधिकरणास मिळवता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती यांचा समावेश होतो.

३. **सार्वजनिक प्राधिकरण:-** कलम २(ज) अन्वये याचा अर्थ, --

क. संविधानाद्वारे किंवा तदन्वये;

ख. संसदेने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे;

ग. राज्य विधानमंडळाने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे;

घ. समुचित शासनाने काढलेल्या अधिसूचनेद्वारे किंवा आदेशाद्वारे स्थापन करण्यात आलेले किंवा घटित करण्यात आलेले कोणतेही प्राधिकरण किंवा निकाय किंवा स्वराज्य संस्था, असा आहे आणि त्यामध्ये:-

(एक) समुचित शासनाची मालकी असलेला, त्याचे नियंत्रण असलेला किंवा त्याच्याकडून निधीद्वारे ज्याला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठ्या प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो असा निकाय;

(दोन) समुचित शासनाकडून निधीद्वारे जिला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठ्या प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो, अशी आशासकीय संघटना, यांचा समावेश होतो.

४. **माहितीचा अधिकार:-** माहितीचा अधिकार याचा अर्थ, कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली व या अधिनियमान्वये मिळवता येण्याजोगी माहिती मिळवण्याचा अधिकार, असा आहे आणि त्यामध्ये -

(एक)एखादे काम, दस्तऐवज, अभिलेख यांची पाहणी करणे;

(दोन) दस्तऐवजांच्या किंवा अभिलेखांच्या टिपण्या, उतारे किंवा प्रमाणित प्रति घेणे;

(तीन) सामग्रीचे प्रमाणित नमुने घेणे;

(चार) डिस्केट, फ्लॉपी, टेप, व्हिडीओ कॅसेट या स्वरूपातील किंवा कोणत्याही अन्य इलेक्ट्रॉनिक प्रकारातील माहिती किंवा जेव्हा अशी माहिती संगणकात किंवा अन्य कोणत्याही उपकरणात साठवलेली असेल त्याबाबतीत मुद्रित प्रती (प्रिंटआऊट) मार्फत माहिती मिळवणे; यांबाबतच्या अधिकाराचा समावेश होतो.

५. **राज्य माहिती आयोग**:- माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम २(ख) अन्वये व्याख्या. राज्य माहिती आयोग हे राज्य सरकारच्या अधीन सार्वजनिक प्राधिकरणांशी संबंधित तक्रारी आणि अपीलांवर कार्यवाही करण्यास सक्षम प्राधिकरण आहे.

**१. पार्श्वभूमी**

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा उद्देश सार्वजनिक प्राधिकरणांकडून मागवलेली माहिती मिळवून देणे असा आहे. माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम २ (च) अन्वये माहितीची व्याख्या करण्यात आलेली आहे तर कलम २(ज) अन्वये सार्वजनिक प्राधिकरण याची व्याख्या करण्यात आलेली आहे. संबंधित कलमे खाली पुनरुक्त केलेली आहेत:-

***कलम २(च)***:- *'माहिती' याचा अर्थ कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य, ज्यामध्ये अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिद्धीपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यांवये सार्वजनिक प्राधिकरणास मिळवता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती यांचा समावेश होतो.*

**कलम २(ज)**:- *'सार्वजनिक प्राधिकरण' याचा अर्थ, --*

*क. संविधानाद्वारे किंवा तदन्वये;*

*ख. संसदेने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे;*

*ग. राज्य विधानमंडळाने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे;*

*घ. समुचित शासनाने काढलेल्या अधिसूचनेद्वारे किंवा आदेशाद्वारे स्थापन करण्यात आलेले किंवा घटित करण्यात आलेले कोणतेही प्राधिकरण किंवा निकाय किंवा स्वराज्य संस्था, असा आहे आणि त्यामध्ये,*

*(एक) समुचित शासनाची मालकी असलेला, त्याचे नियंत्रण असलेला किंवा त्याच्याकडून निधीद्वारे ज्याला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठ्या प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो असा निकाय;*

*(दोन) समुचित शासनाकडून निधीद्वारे जिला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे मोठ्या प्रमाणात वित्त पुरवठा केला जातो, अशी अशासकीय संघटना, यांचा समावेश होतो*

**२. माहितीचा अधिकार अधिनियमाखाली भू-अभिलेख मागता येतात काय?**

माहितीचा अधिकार अधिनियमाच्या अन्वये भू-अभिलेख नक्कीच मागता येतात. श्री सुरेंद्र पाल सिंग विरुद्ध जीएनसीटीडी दिल्ली या प्रकरणात केंद्रीय माहिती आयोगाने हे ग्राह्य धरले आहे. या प्रकरणात, अपिलार्थीने भूखंड धारक, भूखंडांच्या चतु:सीमा आणि कृषिवापरासाठी उपलब्ध भूखंडांबाबत माहिती मागितली होती. पुरवलेली माहिती असमाधानकारक असल्याने व्यथित होऊन त्याने आयोगासमोर द्वितीय अपील सादर केले. प्रतिवादीने ही तृतीयपक्षाची माहिती आहे असा आधार दर्शवत अपवाद लागू होत असल्याचा दावा केला. आयोगाने हा दावा फेटाळताना नमूद केले की मालकांची नावे, चतु:सीमांचे तपशील आणि जमिनीचे मापन यासह भू-अभिलेख शासनाकडे असल्याने ते सार्वजनिक दस्तऐवज आहेत आणि माहितीचा अधिकार अधिनियमानुसार भू-अभिलेखांचे पारदर्शकता अनिवार्य आहे.

**३. माहितीच्या अधिकाराच्या अंतर्गत कोणती कागदपत्रे मागता येतील?**

ज्यांत मालमत्तेचे दस्तऐवज माहितीच्या अधिकाराखाली पुरवण्यात आले अशा काही पूर्ववर्ती आदेशांच्या संदर्भात आपण या प्रश्नाचे उत्तर तपासून पाहू.

१. **फेरफारांचे दस्तऐवज** - श्री जमीर अहमद जुमलाना विरुद्ध केंद्रीय जन माहिती आयुक्त नवी दिल्ली महानगरपालिका या प्रकरणात अपिलार्थीने एका मालमत्तेच्या फेरफाराबाबत माहिती मागितली होती. या प्रकरणात आधी आयोगाने जन माहिती अधिकाऱ्यास गहाळ झालेले दस्तऐवज शोधून पुरवण्याचे आदेश देत निकाल दिला होता. तथापि, त्यावर जन माहिती अधिकाऱ्याने कार्यवाही केली नाही. आयोगाने जन माहिती अधिकाऱ्यास तीन आठवड्यांच्या कालावधीत माहिती पुरवण्याचे आदेश दिले.

२. **कुल मुखत्यारनामा** - अनिल सिंग वि केंद्रीय जन माहिती अधिकारी, उप विभागीय दंडाधिकारी या प्रकरणात केंद्रीय माहिती आयोगाने असे निरीक्षण नोंदवले की कुल मुखत्यारनामा हा सार्वजनिक दस्तऐवज असून तो माहितीच्या अधिकाराखाली मागता येईल. कुल मुखत्यारपत्राचा उद्देश एखाद्या व्यक्तीस दुसऱ्या व्यक्तीशी व्यवहार करण्यासाठी प्राधिकृत करणे असा असतो आणि कुल मुखत्यारनामा ग्राहीला त्याचा वापर संभाव्य ग्राहकाला पटवण्यासाठी करावा लागला असल्याकारणाने तो सार्वजनिक दस्तऐवज समजला जाईल.

३. **हक्क विलेख आणि भू प्रकल्पाच्या लाभधारकांचे तपशील** - डॉ के वेंकट राव विरुद्ध जन माहिती अधिकारी, गृहनिर्माण आणि शहरी दारिद्र निर्मूलन मंत्रालय या प्रकरणात अपिलार्थीने एका प्रकल्पातील घरांच्या वाटपाच्या लाभधारकांबाबत माहिती मागितली होती. मागितलेली माहिती पुरवण्यात आली नाही आणि द्वितीय अपील देखील सुनावणीस अनुपस्थित राहण्याच्या कारणाने फेटाळण्यात आले. अपिलार्थीने दिल्ली उच्च न्यायालयासमोर आदेशाला आव्हान दिले आणि

न्यायालयाने रद्द करण्याचे आदेश दिले. या सुनावणीनंतर, प्रकरण केंद्रीय माहिती आयोगापुढे पुढे चालवले गेले. आयोगाने प्रतिवादीला पाहणी करण्यास सहकार्य करण्याचे आणि माहिती १५ दिवसात पुरवण्याचे आदेश दिले आणि त्याखेरीज हक्क विलेख सार्वजनिक दस्तऐवज असल्याचेही ग्राह्य धरले.

४. माहितीच्या अधिकाराखालील एका अर्जामुळे असे उघडकीस आले की एका अधिकाऱ्याने कारगिल युद्धात लक्षणीय कामगिरी बजावणाऱ्या सैनिकांसाठी आणि अशा युद्धवीरांच्या विधवांसाठी असलेल्या घरांपैकी ४० घरे सामान्य नागरिकांना देण्यास अनुमती दिली. आदर्श सहकारी गृहरचना संस्था मर्यादित विरुद्ध भारत सरकार आणि अन्य या प्रकरणातील भ्रष्टाचाराचे आरोप सिद्ध करण्यासाठी त्यातून महत्वाचे पुरावे हाती लागले.

५. सन २००५ मध्ये तामिळनाडू माहिती आयोगाने राज्य शासनास १९८४ पासूनचे सर्व महसूल अभिलेखांचे अंकीकरण (डिजिटलायझेशन) करण्याचे आदेश दिले.

६. एका माहितीच्या अधिकाराखालील अर्जाद्वारे नुकतेच असे उघडकीस आले की गोवा भूमिपुत्र अधिकारिणी विधेयक २०२१ याला ते गोवा राज्याच्या विधानसभेत सादर करण्यापूर्वी प्रशासकीय मंजुरी देण्यात आलेली नव्हती आणि त्याचे संभाव्य व्यापक परिणाम नजरेआड झाले होते.

७. कौस्तुभ उपाध्याय विरुद्ध कार्मिक आणि प्रशिक्षण खाते या प्रकरणात केंद्रीय माहिती आयोगाने असे ग्राह्य धरले की, एखाद्या शासकीय सेवेतील व्यक्तीने सादर केलेली वार्षिक मालमत्ता विवरणपत्रे सार्वजनिक आहेत आणि ती माहितीच्या अधिकाराखाली पुरवता येतील. ती भ्रष्टाचार रोखण्याचे एक साधन ठरतील. परंतु, हि तृतीयपक्षाची माहिती असल्याने जन माहिती अधिकाऱ्याने संबंधित तृतीयपक्षास अशा माहितीबाबत नोटीस देणे अनिवार्य आहे.

## ४. अधिकृत संकेतस्थळांवर उपलब्ध असलेली माहिती

माहितीच्या अधिकाराबाबत भू संसाधन खात्याच्या अधिकृत संकेतस्थळावर पुढील माहिती उपलब्ध आहे.

१. जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्या समितीचे तपशील:
https://dolr.gov.in/sites/default/files/DoLR_OM_dated_24_05_21_0.pdf

२. स्वेच्छा प्रकटीकरण समितीचे तपशील:
https://dolr.gov.in/sites/default/files/DoLR_OM_dated_24_05_21_0.pdf

३. पुढाकार घेऊन करण्याच्या प्रकटीकरणासाठीच्या नोडल अधिकाऱ्याचे तपशील: https://dolr.gov.in/sites/default/files/Annexure-6.pdf

४. वेगवेगळया खात्यांच्या जन माहिती अधिकारी/ प्रथम अपिलीय प्राधीकारी यांचे तपशील: https://dolr.gov.in/sites/default/files/8-2-2021.pdf

**५. युक्त्या आणि क्लुस्या**

महसूल अभिलेखाच्या संदर्भात माहितीच्या अधिकाराखाली माहिती मागण्याच्या अर्जाला अपवाद लागू होणे टाळण्यासाठी अर्जदाराने माहिती त्याच्याशी संबंधित कशी आहे आणि तिच्यामुळे कोणत्याही तृतीयपक्षाच्या व्यक्तिगततेचा कसा भंग होत नाही हे स्पष्ट करणे आवश्यक आहे. अर्जाच्या सुरुवातीला अन्य संदर्भ पुरवणारा संक्षिप्त परिच्छेद सामील केल्याने मोठा फरक पडू शकेल.

त्यामुळे पुढील तीन गोष्टी साध्य होतील:-

१. माहिती अर्जदाराशी कशी संबंधित आहे हे जन माहिती अधिकाऱ्यास स्पष्ट होईल.

२. जन माहिती अधिकाऱ्यास मागितलेल्या माहितीचे स्वरूप आणि निश्चितपणा नीट लक्षात येण्यास मदत होईल.

३. त्यामुळे माहिती मागण्याची प्रक्रिया सुलभ होऊन फेटाळणीची शक्यता कमी होईल.

*उदाहरणार्थ:*

माझ्या म्हणजे 'जेठालाल गडा यांच्या' नावे दिनांक २०.१.२०२१ रोजी 'श्री तारक मेहता यांनी उपनिबंधक कार्यालय, ग्वाल्हेर यांच्यापुढे निबंधन क्र XXXX पत्रिकासंच क्रमांक XXXX पृष्ठ क्र XX द्वारे पृष्ठांकित केलेल्या कुल मुखत्यारपत्राची प्रत कृपया पुरवावी.

*<u>माहितीच्या अधिकाराखाली तहसील कचेरीत सादर करण्याचा नमुना अर्ज</u>*

नोव्हेंबर ११, २०२१

प्रति,

जन माहिती अधिकारी

तहसील कचेरी, कालका

हरयाणा, भारत

मा. महोदय/ महोदया

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलाम ६(१) अन्वये पुढील माहिती मागवण्यात येत आहे. कृपया पुढील माहिती पुरवावी:-

१. अबक भू वाटप योजनेअंतर्गत लाभधारकांची यादी.
२. अबक भू वाटप योजनेअंतर्गत लाभधारकांना वाटप केलेल्या जमिनीच्या चतुःसीमा.
३. ज्यांनी वाटप केलेली जमीन स्वीकारलेली आहे अशा लाभधारकांची यादी.
४. ज्यांनी वाटप केलेली जमीन स्वीकारलेली नाही अशा लाभधारकांची यादी.

आपला,

यक्षज्ञ

**अर्ज निकाली काढण्यापूर्वी कृपया या बाबी विचारात घ्याव्यात:-**

१. आवश्यक असल्यास, कृपया माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ५(३) अन्वये माहिती मिळवण्यास *'रास्त सहकार्य करावे'*.

२. माहिती पूर्णतः किंवा अंशतः कोणत्याही अन्य विशिष्ठ खात्याकडे उपलब्ध असल्यास, कृपया कलम ६(३) अन्वये अर्ज, अंशतः किंवा पूर्णतः, संबंधित खात्याकडे अंतरित करावा.